**पुणे मेट्रोच्या भूमिगत कामासाठी ISO गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान**

**पुणे 18.03.2020:** पुणे मेट्रो वनाज ते रामवाडी , पीसीएमसी ते स्वारगेट येथील दोन मार्गिकांचे काम करत आहे. या दोन मार्गिकांची एकत्रित लांबी ३२ किमी आहे. पीसीएमसी ते स्वारगेट या मार्गिकेमध्ये कृषी महाविद्यालय ते स्वारगेट ही मार्गिका भुयारी असणार आहे. या ५ किमीच्या भुयारी मार्गिकांचे काम १ डीसेंबर २०१९ रोजी टनेल बोरिंग मशीन द्वारे सुरु करण्यात आले होते. भुयारी मार्गासाठी सध्या दोन टीबीएम द्वारे भुयारांचे काम सुरु आहे. प्रथम भुयारी मशीन मुठाने आतापर्यंत ८२० मी . बोगदा तयार केला आहे. तर दुसऱ्या टीबीएम मशीन मुळाने २१० मी. बोगदा तयार केला आहे. बोगद्यासाठी लागणाऱ्या काँक्रिट रिंग डेक्कन महाविद्यालय पटांगण बनविण्याचे प्रकल्प उभारण्यात आला आहे. आतापर्यंत १००० रिंग बनविण्यात आले आहे.

भुयारी मार्गाचे काम जागतिक गुणवत्तानुसार करण्यात येत आहे. नुकतेच रिंग बनविण्याचे कास्टिंग यार्ड , भुयारी मार्गाचा टप्पा १- ( कृषी महाविद्यालय ते फडके हौद ) आणि भुयारी मार्ग टप्पा २ ( फडके हौद ते स्वारगेट ) या कामासाठी ISO ९००१ : २०१५, ISO १४००१: २०१५ (Environment Management System ) आणि ISO ४५००१ :२०१८ (Occupational Health & safety Management System ) प्रमाणपत्र ANAB कंपनी मार्फत प्राप्त झाले आहेत.

ISO ९००१: २०१५ चे प्रमाणपत्र भूमिगत मार्गाचे आरेखन व बांधकाम तसेच कास्टिंग यार्ड येथील गुणवत्ता नियंत्रण यासाठी देण्यात आले आहे. महामेट्रोने भूमिगत तसेच उन्नत मार्गाचे काम करताना पर्यावरणाचा सखोल अभ्यास करून पर्यावरण जपवण्याच्या दृष्टीने सर्व प्रकारची काळजी घेऊन बांधकाम सुरु केले आहे. पुणे मेट्रोचे भूमिगत कामाचा पहिला टप्पा म्हणजे (कृषी महाविद्यालय ते फडके हौद) , दुसरा टप्पा ( फडके हौद ते स्वारगेट) व डेक्कन येथील कास्टिंग यार्ड येथील काम ISO १४००१/२०१५ (Environment Management System) या निकषांद्वारे करण्यात येत आहे. आणि त्यामुळे ISO १४००१/२०१५ हे प्रमाणपत्र प्राप्त झाले.

पुणे मेट्रोमध्ये सुरक्षा आणि कामगारांचे स्वास्थ्य यावर लक्ष ठेवण्यासाठी Safety, health & Environment (SHE) असा विभाग आहे. महाप्रबंधक दर्जाचा या विभागाचा प्रमुख असून या विभागाद्वारे सुरक्षा उपाययोजना कर्मचाऱ्यांची स्वास्थ्य याविषयी नियंत्रित संगोष्टी निरीक्षण व इन्स्पेकशन करण्यात येत असते. महामेट्रोमधील कामगारांचे नियमित स्वास्थ्य तपासणी साठी २४X७ तज्ज्ञ डाक्टरची नेमणूक केलेली आहे. तसेच नियमितपणे सर्व कामगारांच्या स्वास्थ्य तपासणी होत असते. महामेट्रोने सुरक्षा व स्वास्थ्य विषयक काम जागतिक दर्जाच्या गुणवतेनुसार करत असल्यामुळे भुयारी मार्गाचा टप्पा १ , टप्पा २ व कास्टिंग यार्ड यांना नुकतेच Occupational Health & Safety Management System ISO ४५००१: २०१८ चे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. याप्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दीक्षित यांनी सांगितले आहे महामेट्रोची सर्वच कामे जागतिक दर्जाच्या गुणवत्ता नियंत्रक प्रणालीनुसार राबवण्यात येत आहे. महामेट्रो काम करताना सुरक्षा व कामगारांच्या स्वास्थ्याकडे अत्यंत कटाक्षाने लक्ष देत आहे. महामेट्रोच्या या प्रयत्नांमुळेच ISO ९००१ /१४००१ व ISO ४५००१ हे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.